# डॉ. गोविंद गारे यांचे आदिवासीं विषयक सुधारणावादी विचार

प्रा. एस. बी. चपटे

भारतीय आदिवासींच्या संदर्भात आजवर अनेकांनी वेगवेगळया दृष्टिकोनातून मते व्यक्त केली आहेत. वस्तुनिष्ठ अभ्यासापासून स्वकीय-परकीय भावनेतून निर्माण झालेल्या एकतर्फी प्रतिपादनापर्यंत अनेक मतप्रवाह त्यात आलेले आहेत. परंतु तरीही आदिवासींचे प्रश्न आजही पूर्णपणे सुटलेले नाहीत, असेच सर्वांचे मत आहे. प्रश्न सुटले नाहीत याची कारणे अनेक असू शकतील. मुळात प्रश्नच नीटपणे समजले नसतील, त्यावर योग्य इलाज योग्यप्रकारे वा योग्यवेळी केला नसेल, किंवा काही प्रश्न सोडवीत असताना नवीन प्रश्न निर्माण झाले असतील. अशा भिन्न भिन्न कारणांमुळे आदिवासींच्या समस्यांवर योग्य व परिणामकारक उपाय सापडला नसणे शक्य आहे.

आदिवासींच्या समस्या मुख्यत: दोन प्रकारच्या आहेत. आदिवासींना स्वत:च्या जीवनपरिसरातच राहून पारंपरिक पध्दतीने जगत असताना ज्या अडचणी निर्माण होत असतील त्या पहिल्या प्रकारात मोडतात, तर भारतीय समाजजीवनाच्या दृष्टिकोनातून आदिवासींकडे पहात असताना, आणि एकंदर भारतीय जीवनाच्या स्थैर्याच्या वा प्रगतीच्या दृष्टिने आदिवासी जीवनात जी स्थित्यंतरे अपरिहार्य वाटतात आणि जी स्थित्यंतरे घडवून आण्याण्याकरिता एखादा कार्यक्रम आखला जातो त्यातून उभ्दवणाऱ्या समस्या ह्या दुसऱ्या प्रकारात मोडतात. म्हणजे आदिवासींच्या स्वत:च्या आणि त्यांच्या जीवनात या ना त्या कारणाने "ढवळाढवळ" करू पाहणाऱ्या बिगर आदिवासींच्या अशा ह्या समस्या आहेत.

आदिवासींच्या स्वत:च्या दृष्टिकोनातून ज्या समस्या निर्माण होऊ शकतात अगर झालेल्या आहेत त्यातही दोन प्रकार आहेत. आदिवासींच्या प्रादेशिक अलिप्ततेला, त्यांच्या सांस्कृतिक वेगळेपणाला, आर्थिक स्वयंपूर्णतेला व राजकीय स्वायत्ततेला बाह्य लोकांच्या संपर्काने बाधा आली त्या त्या वेळी आदिवासींत सुप्त किंवा प्रगट असंतोष निर्माण झाला असल्यास नवल नाही. अशा वेळी आदिवासींना बाहय लोकांचा संपर्कच नको वाटणे साहजिकच आहे.त्यांच्या इच्छेविरूध्द हा संपर्क वाढत गेल्यास ती एक त्यांना समस्या वाटते. याविरूध्द आपल्या कुवतीप्रमाणे त्यांनी आंदोलन केल्याची व चळवळी उभारल्याची उदाहरणेही आहेत. बाह्य लोकांच्या संपर्कामुळे "बाह्य जीवनाची व संस्कृतीची" ओळख होऊन आदिवासींच आशा आकांक्षा विस्तारण्याची व वाढण्याची शक्यताही नाकारता येणार नाही. या विस्तारीत आकांक्षांची पूर्ती त्यांना योग्य वा सुलभ वाटलेल्या मार्गांनी जर करता आली तर त्यांच्यात असंतोष धुमसण्याची शक्यता आहे. आज अनके ठिकाणी वेगवेगळया मार्गाची प्रगट झालेली "प्रादेशिक अलिप्तता" ही आदिवासींच्या दृष्टिकोणातून जरी इष्ट असली आणि ऐतिहासिक कालात जी जरी लादली गेली किंवा इष्ट, ग्राह्य अगर अपरिहार्य मानली गेली असली तरी राष्ट्रींय ऐक्य व सांकृतिक-सामाजिक अभिसरणाच्या दृष्टिने आदिवासींना सदैव, सर्वथैव अलिप्त ठेवणे योग्यही नव्हे आणि हिताचेही नव्हे, हे नाकारता येणार नाही. यावरून आदिवासींचा संबंध बाह्य जगाशी येणे नुसते इष्टच नव्हे, तर अपरिहार्यही आहे हे स्पष्ट आहे.

"भाषा, संस्कृती, अर्थकारण" यांच्या संदर्भात आदिवासींना भारतीय जन-जीवनापासून अलिप्त ठेवणे हे त्याज्य मानून त्यांना अधिकाधिक भारतीय जन-जीवनाशी समरस होण्यास सुलभ करून देणे हे राष्ट्रींय एकात्मतेच्या दृष्टीने आवश्यक आहे. परंतु ही एकात्मता साधण्याचा व अस्मिता निर्माण करण्याचा मार्ग कोणता याबद्दल अजूनही एकवाक्यता दिसून येत नाही.एकवाक्यता दिसून येईल तिथे उपक्रमशीलता दिसून येत नाही. आदिवासींच्या प्रदेशाची आर्थिक उत्पादनक्षमता पूर्णपणे न वापरताच आदिवासींची बौध्दिक क्षमता वापरण्याच्या अगर वाढविण्याच्या योजना आखल्या तर सुशिक्षित आदिवासींना आपल्या शिक्षणाचा उपयोग करून घेण्याकरिता बिगर आदिवासी नगराकडेच धाव घ्यावी लागते आणि अर्थोत्पादनातील प्रादेशिक असमतोलही कायम राहतो. आदिवासींना योग्य ते शिक्षण न देता त्यांच्या प्रादेशिक अर्थसाधनांचा वापर सुरू केल्यास आदिवासी

प्रदेशात बाह्यजनांच्या प्रवेश होऊन आदिवासींचे कळत नकळत शोषण वाढवण्याची भीती आहे. म्हणून आदिवासींच्या संदर्भात व्यक्ती आणि प्रदेश यांचा विकास एकाच वेळी हवा.बाहेरून आदिवासी जीवनाकडे पहात असताना बाह्य जगाशी त्यांचा जो संपर्क येईल त्यातून त्यांच्या शोषणास संधी प्राप्त होऊ नये.परंतु आजवर मात्र अशा संपर्कापासून आदिवासींचे शोषणच झालेले आहे असे सर्वांचे मत आहे. हे शोषण मुख्यत: आर्थिक आहे. परंतु आर्थिक शोषण नेमके कशाला म्हणावयाचे, याविषयीही नीटपणे पाहू गेल्यास सर्वांच्याच बाबतीत वैचारिक संदिग्धता दिसून येते.आदिवासींची पारंपरिक अर्थव्यव्यवस्था अगर त्यांचे वन-संपत्तीवरील पारंपरिक हक्क कायम रहावेत असे काहींचे म्हणणे आहे. या विचारसरणीत “आदिवासी सध्या बहुसंख्येने आणि परंपरेने राहतात ती भूमी त्यांच्या मालकीची समजावी आणि बाह्य लोकांचा तिथे होणारा शिरकाव हे एक प्रकारचे अतिक्रमण आहे” ही भूमिका असते.देशात इतरत्र दिसून येणारा प्रदेशवाद व प्रादेशिक स्वायततेची बैठक या विचारसरणीत आहे हे स्पष्ट आहे.आदिवासी हे अशिक्षित, भोळया स्वभावाचे, प्रामाणिक व एका अर्थाने भिन्ने असल्यामुळे त्यांच्या या गुणावगुणांचा फायदा बाहेरील लोकांनी वेळोवेळी उठविला आहे. बाह्य लोकांचा असा हा शिरकाव अनियंत्रितपणे त्यांच्या प्रदेशात होऊ लागला तर परिणामी आदिवासींच्या नशिबी स्वगृहीच परका अगर पाहुणा म्हणून राहण्याची पाळी येईल अशी भीती आहे. आणि ती खरीही आहे. कारण आजवर बाहेरून आलेल्या लोकांनी मोठया प्रमाणावर त्यांच्या मालकीच्या जमिनी बळकावल्या आहेत. अनेक ठिकाणी आदिवासी लोकसंख्या व जमिनीची मालकी ही काळाच्या ओघात व्यस्त झाली आहे. महाराष्ट्रातील उदाहरण द्यायचे तर डहाणू, शहापूर, वाडा (ठाणे), तळोदा, शहादा (धुळे) या भागात देता येईल.

याच विचारसरणीनुसार आर्थिक शोषणाचा दुसरा प्रकार म्हणजे आदिवासींची अर्थव्यवस्था व वन-संपत्तीवरील त्यांचे पारंपरिक हक्क हे शासकीय निर्बंधांमुळे अगर आदिवासींच्या स्वीकारलेल्या अनेक कार्यक्रमांमुळे नष्ट अगर कमी होणे हा होय. शेतीशिवाय अन्य उपजीविकेची साधने नसल्यामुळे आणि बहुसंख्य बिगर आदिवासींप्रमाणेच आदिवासींनाही मालकीची शेतजमीन हीच आर्थिक सुरक्षितता देणारे साधन वाटते. म्हणून अधिकाधिक जमीन शेतीखाली आणण्याकरता तो भोवताली पसरलेल्या जंगलावर अतिक्रमण करतो.त्याला अन्य साधने उपलब्ध होत नाहीत तोवर हे अपरिहार्य आहे. परंतु वन-संपत्ती ही राष्ट्राच्या मालकीची आहे आणि ती संपत्ती टिकविणे, वाढविणे आणि तिचा राष्ट्राच्या दृष्टिने अधिक उपयोग व्हावा म्हणून तिचे रक्षण करणे हे शासनाचे कर्तव्य ठरते. शासनाचे धोरण आणि आदिवासींची आर्थिक निकड यांचा अन्य साधनांच्या अभावी मेळ बसविणे कठीण आहे. त्याचप्रमाणे आदिवासींमध्ये प्रचलित असलेल्या अर्थोत्पादनाच्या साधनांमध्ये व पध्दतीमध्ये सुधारणा घडवून आणण्याकरिता आणि त्यांच्यातील अंधविश्वास व बाह्य जगाबद्दलची अढी, शिक्षण, दळणवळण, कर्ज घेण्याची प्रवृत्ती, आरोग्य, स्वच्छता, घराची मांडणी व बांधणी इत्यादींमध्ये आवश्यक बदल घडवून आणण्याकरिता शासनाने ज्या काही योजना आखल्या असतील त्याही आदिवासींकडून विश्वासाने स्वीकारल्या जातील असे नाही. याही बाबतीत अनेक वेळा उभयपक्षी पेच निर्माण होतो.

अशा रीतीने आदिवासींच्या प्रश्न अलिप्तता आणि संपर्क या दोन्ही अवस्थांमध्ये यार ना त्या रूपाने कायम राहतो.याला कारण म्हणजे आदिवासींचा मागासलेपणा हा सर्वव्यापी आहे. म्हणजे प्रादेशिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक-सामाजिक या चारही क्षेत्रात आदिवासींचा मागासलेपणा सर्वच क्षेत्रांतून हटविण्याचे प्रयत्न एकाच वेळी व्हावयास हवेत. याकरिता बाह्य जगाचा व त्यांच्या संस्कृतीचा संपर्क अपरिहार्यच नव्हे, तर इष्टच मानला पाहिजे.

आदिवासींचा संबंध बाह्य जगाशी अधिकाधिक आल्याने त्यांच्या संस्कृतीची काही वैशिष्टये, उदा.नृत्य, संगीत, हस्तकौशल्य तसेच निसर्गरत जीवनात दिसून येणारे त्यांचे शौर्य, धैर्य, साहस स्वच्छंदीपणा इत्यादी नष्ट होतील असे काहींचे म्हणणे आहे.यांत्रिक उपकरणांच्या आगमनाबरोबर मानवनिर्मित आणि यंत्रांनी बध्द अशी एक कृत्रिम चाकोरी निर्माण होते हे खरे आहे.परंतु हे अपरिहार्य आहे.भौतिक प्रगती साधवयाची असेल तर त्याला त्याची किंमतही मोजावी लागते.संस्कृती शून्यातून निर्माण होत नाही.ती मानवी जीवनाच्या व्यवहारातून, साधनातून दैनंदिन झगडयातून व संकलित अनुभवातून निर्माण होते.जीवनाची साधने बदलली, झगडयाचे स्वरूप व अनुभव बदलले की जुन्या संस्कृतीला अर्थ राहात नाही.ती हळूहळू का

होईना आपोआप गळून पडते.तिच्या जागी अर्थपूर्ण आणि प्रचलित समाजधारणेस अनुकूल अशी नवी संस्कृती येणे क्रमप्राप्त असते.इतिहासात मानवाच्या प्रगतीची पाऊले अशीच उमटत आली आहेत. बदलत्या परिस्थितीशी तडजोड करीतच मानवाने प्रगती साधली आहे.नव्हे, अशी तडजोड करणेच मानवाचे मुख्य लक्षण ठरले आहे.आणि अशी तडजोड न करणारे प्राणी नामशेष झाले आहेत. तेव्हा आदिवासींची जुनी संस्कृती नष्ट होईल म्हणून खळखळ करण्यात अर्थ नाही.जगातील मोठमोठया संस्कृत्यांचेही असेच झलेले आहे.कोणत्याही आदिवसी जमातीचा इमिहास पाहिला तरी ही गोष्ट दृष्टित्पत्तीस येते.सर्व संपर्कापासून अलिप्त समजलेली उदा. माडिया गोंड, मुरिया गोंड जमातसुध्दा, थोडी का होईना, परंतु कालांतराने बदलत गेलेली दिसेल. शेतीच्या पध्दतीत वापण्याच्या अवजारात, बागायती व जिरायती पिकांच्या प्रकारात, वेषभूषेत, धार्मिक चालीरीतीत, देव-दैवतांत, विवाह-प्रकारात आदिवासी जमाती बदलत चालल्या आहेत. एवढेच नव्हे तर, त्यांच्या संपर्कात आलेल्या बिगर आदिवासी जीवनाशी त्या अधिक समरस झाल्याचे दिसून येईल. “समान संस्कृती” ही समन्वयातून, मुख्यत: संपर्कातून व अनेक स्तरावरील देवाणघेवाणीतून निर्माण होते. तेव्हा अनिष्ट परिणामाबद्दल योग्य ती खबरदारी घेऊन् हा संपर्क अधिकाधिक वाढविणेच योग्य आहे.आदिवासी जमातीच्या अभ्यासकाला त्यांच्या ह्या सांस्कृतिक वैविध्यातून प्रागतिक टप्पे स्पष्ट व्हावेत अशी अपेक्षा आहे.

“आदिवासी” वर विचार मांडताना समाजशास्त्रज्ञांचा मुख्य भर “संस्कृतीवर” असतो.आदिवासी एक निराळी अशी संस्कृती आहे. पण जसजशी ही मंडळी बाहेरच्या जगाच्या संपर्कात येतात तसतशी त्यांची ही संस्कृती देशाच्या व्यापक संस्कृतीत विलीन होत असते, हे निर्विवाद होय. आज हा समाज समाजापासून दूर रानाडोंगरात रहात आहे. त्यांची स्वत:ची गावेच्या गावे वसलेली आहेत. बाह्य विकासप्रक्रियेमुळे आता ह्या रानाडोंगरात सुध्दा रस्ते व दळणवळणाची साधने उपलब्ध होऊ लागली आहेत. त्यायोगे बाहेरच्या समाजाबरोबर ह्या लोकांचा संबंध वाढत आहे. तसेच, बाहेरचा समाजही काही ना काही निमित्ताने आदिवासी भागात वावरू लागला आहे.त्याचा परिणाम म्हणजे दोघांच्याही जीवनावर एकमेकांच्या संपर्काने परिणाम घडत आहेत. देशात सर्वत्र भौतिक शास्त्राच्या प्रगतीमुळे बदल घडून येत आहे.“अवकाश युग” किंवा “अणुशक्ती युग” सुरू झाले आहे.पृथ्वीपासून 800 मैल उंचीवरून मनुष्य अवकाशात चालू शकतो.एखादे अवकाशयान पृथ्वीपासून अडीच-तीन लाख मैलांवर असणाऱ्या चंद्राभोवती फिरू शकते व तेथून संदेश व छायाचित्रे पाठवू शकते.किंवा एखादा हायड्रोजन बॉंब सगळे जग एका सेकंदात नष्ट करू शकतो.ह्या ज्या गोष्टी घडून येतात त्यांना आपण शास्त्राचा विकास म्हणतो.हा विकास आदिवासींपर्यंत जाऊन पोहोचला नसला तरी त्यांना ह्याबद्दलची माहिती आता अनेक मार्गांनी होऊ लागली आहे. आज ना उद्या हे सर्व शोध त्यांच्यापर्यंत जाऊन पोहोचतील. अवकाश यानातील माणसे लवकरच आदिवासींमधूनही निवडली जातील. तसेच अण्वस्त्रे किंवा हायड्रोजन बॉंब तयार करण्यातही आदिवासींचा हात राहील. कदाचित ह्या शक्तीचा उपयोग त्यांचेकडून विधायक कार्याकरिता होऊन सर्व जीवनच बदलेल असा आशावाद बाळगायला हरकत नाही.

येथे विसरता कामा नये की, 18 वर्षावरील प्रत्येक आदिवासी प्रौढ स्त्री-पुरूषाला स्वतंत्र भारताच्या घटनेप्रमाणे मत प्राप्त झाले आहे.मागच्या अनेक निवडणुकीत त्यांनी आपला हा हक्क बजाविला आहे. इतकेच नव्हे तर, लोकसंख्येच्या प्रमाणात लोकसभेवर व राज्य कायदेमंडळावर त्यांनी आपले आदिवासी प्रतिनिधी निवडून दिले आहेत. त्यायोगे मंत्रीमंडळातही त्यांचा मंत्री, उपमंत्री म्हणून समावेश झाला आहे. ही मंत्रीमंडळेच अवकाशयानातून कोणाला पाठवावयाचे, अण्वस्त्रे कोणी बनवायची, त्याचा उपयोग कधी व कसा करावयाचा वगैरे बाबीचे निर्णय घेतात. अशा लोकशाही निर्णयप्रक्रियेत आदिवासी प्रतिनिधीचा सहभाग असतो हे बदलाचे लक्षण आहे. सर्वोच्च निर्णयप्रक्रियेत आदिवासी भाग घेऊ शकतो, हे लोकसभेचा माजी सभापती श्री.संगमा याच्या रूपाने सर्वांना माहीत झालेले आहे.

आफ्रिका खंडातील बहुतेक सर्व आदिवासी स्वतंत्र झाले असून त्यांनी आपली स्वतंत्र अशी राष्ट्रे बनविली आहेत, असे दृश्य आपणास दिसते. तसेच ही राष्ट्रे इतर पुढारलेल्या राष्ट्रांच्या बरोबरीस कशी लवकर येतील याबद्दल त्यांचे जोराचे प्रयत्नही चालू आहेत. भारतात आदिवासींपैकी नागा व मिझो ह्या जमातींनी भारतापासून फुटून निघून स्वतंत्र राज्य बनण्याकरता मागची अनेक वर्षे भारताबरोबर सशस्त्र लढा दिला. कोणती तरी परकी सत्ता त्यामागे होती असे अनुमान काढले जाते. पण ह्या परकी

प्रेरणेचा परिणाम इतका काळ सशस्त्र बंडात होऊ शकतो, ही एक ध्यानात घेण्यासारखी घटना होय. वर्षापूर्वी मध्यप्रदेश, गुजरातमध्ये जे अनिष्ट प्रकार त्याविरूध्द मोठा आवाज उठला. असे आवाज आदिवासी जनतेतील नवी जागृती दर्शवितात. बिहारमध्ये आदिवासींचे निराळे राज्य झारखंड निर्माण करण्याकरिता प्रयत्न चालू आहेत. बोडोलॅन्डची मागणी वाढत आहे.महाराष्ट्र राज्यात डाव्या विचारसरणीला आदिवासी जनतेचा पाठिंबा कमी होत चालला आहे.हे कशाचे द्योतक आहे. आदिवासी जनतेच्या मन:स्थितीत मोठा बदल घडून येत आहे. ह्याचे हे चिन्ह होय. त्यांची राजकीय जागृती व त्याचबरोबर आलेला निराशावाद हे त्यांच्या असंतोषाचे मुख्य कारण होत आहे.त्यांचे दारिद्र व बेकारी कमी झाली व जंगल, जमीन आणि जलावरील त्यांचे हक्क व अधिकार प्रस्थापित झाले तर त्यंच्या असंतोषाची आग विझविणे शक्य होईल.

आदिवासी संस्कृतीमध्ये “आदिवासी धर्म” ही संकल्पना आहे.त्यांचा धर्म म्हणजे प्रकृतिवाद आहे.हे आदिवासी हिंदुधर्मीयांबरोबर हजारो वर्षे रहात आले आहेत. परंतु हिंदु धर्मीयांनी त्यांना आपणात मिसळवून घेण्याचा प्रयत्न केव्हाही केला नाही.एवढेच नव्हे तर हिंदू धर्माच्या व जातिव्यवस्थेच्या चौकटीत आदिवसींना बसविता आलेले नाही, ते परके आणि दूरचे म्हणूनच त्यांना बाजूला ठेवण्यात आले. धर्माची चौकट आदिवासींना कधीही लावली गेली नाही, फक्त त्यांच्यावर प्रभुत्व कसे गाजवावे व त्यांना आपले गुलाम कसे करावे हाच त्यांचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष प्रयत्न झालेला दिसतो. पण ह्या प्रयत्नात हिंदुधर्तीयांना पुरेसे यश आलेले नाही.कारण आदिवासी अगदी दूरदूरच्या जंगलांचा, पर्वतांचा, पहाडांचा आश्रय घेता झाला.दुसऱ्या धर्मातील लोकांना आपल्या धर्मात घेण्याची हिंदुधर्तीयांत सहिष्णुता नाही.त्याची कारणे अनेक असू शकतील. पण मुख्य कारण त्यांच्यातील “जातीभेद” हे आहे.तसेच जात हा उत्पादक वर्ग आहे.जातीचे धंदे आणि उत्पादन ठरलेले आहे, अशी संकल्पना हिंदू अर्थशास्त्रात प्रमाण मानली आहे. धर्तांतर केल्यावर कोणास कोणते जातीत घालावयाचे, तसेच ती जात अशा माणसाला सामावून घेण्यास तयार होईल काय, “उत्पादक घटक” म्हणून अशा धर्मान्तर केलेल्या जाती नव्या व्यवस्थेत स्थिरावतील काम असे गुंतागुंतीचे प्रश्न यातून उद्भवतात. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे आदिवासी जनतेच आपल्या प्रतीकवादी धर्मावरील श्रध्दा ही होय. ह्या श्रध्देमुळेच आज ते हजारो वर्षे आपले स्वतंत्र आणि निराळे जीवन जगत आहेत. त्यांच्या प्रकृतिधर्मापमाणे त्यांच्या स्वतंत्र अशा प्रतीकरूप देवता आहेत. ह्या देवता म्हणजे त्यांच्या रोजच्या जीवनावर ज्यायोगे परिणाम होतो अशाच प्राकृतिक पंचमभूतांसारख्या आहेत. त्यंचे म्हणणे असे आहे की प्रत्येक महाभूतामागे एक अदृश्य अशी शक्ती आहे. तसेच, पूर्वज-पूजा हेही त्यांच्या धर्माचे एक वैशिष्टये आहे.ह्या पूर्वजांचा प्रत्येक कौटुबिक कृत्यावर परिणाम होत असतो अशी त्यांची भावना आहे.मरणानंतर पूर्वज भूतपिशाच्चात रूपांतरित होतात असा त्यांचा समज आहे.आपल्या देवतांकरिता त्यांनी कधी मंदिरे बांधली नाहीत किंवा त्यांची पूजाही केली नाही.त्यांची पूजा म्हणजे ह्या देवतांना वेगवेगळया रूपाने नवैद्य देणे हीच होय. त्यांचे उपाध्याय म्हणजे त्यांचे “भगत”, “भूमा”.एखादा पूर्वज आपणावर रागावला आहे आणि त्याचा राग घालविण्याकरिता काय करावे तेही ह्या भगतांकडून समजते.

अलिकडे पुढारलेले आदिवासी हिंदूंच्या वागणुकीचे अनुकरण करून लग्न, मरण वगैरे प्रसंगी हिंदुधर्मीयाप्रमाणे वागू लागले आहेत. लग्नकार्यात गावची सगळयांत वडील स्त्री “धवलेरी” तिचा आता तेवढा मान राहिलेला नाही. तिच्याऐवजी “उपाध्याय”, “तात्या” आला आहे.लग्न म्हणजे नाच-गाणी, दारू ह्या कल्पनेसही फाटा मिळाला आहे.मरणोत्तर पिंडदान देण्याची प्रथा त्यांच्यात सुरू झली आहे.पण हिंदुधर्मातील अशा अनेक चालीरीती त्यांनी स्वीकारल्या असल्या तरी ते पुरे हिंदू बनलेले आहेत असे म्हणता येणार नाही. म्हणूनच आदिवासींना लौकिक अर्थाने हिंदू म्हणणे बरोबर असले तरीखरे ते हिंदू नव्हेत व नाहीत.आदिवासींना स्वत:ला हिंदू म्हणवून घेतल्याचा कुठे इतिहास नाही. आदिवासींचा निसर्गधर्म हिंदू धर्मापेक्षा पुष्कळ प्राचीन आणि मूलभूत मानला पाहिजे.

आता आपण ख्रिस्ती धर्माकडे वळू या.ह्या देशात सुमारे दोन-तीन कोटी ख्रिस्ती बांधव असतील. त्यापैकी आदिवासी किती हे सांगता येणार नाही.पण त्यांची संख्या फारशी नसावी असे दिसते. काही राज्यात, विषेषत: आसाम, नागालँड, मिझोराम, मेघालय, अरूणाचल, बिहार व मध्यप्रदेश ह्या राज्यांत ही संख्या जास्त असेल, पण इतरत्र ती अगदी थोडी दिसते. उदाहरणार्थ,

महारष्ट्रात अनेक आदिवासी ख्रिस्ती झाले, पण बहुसंख्य आदिवासींच्या जीवनावर ख्रिस्ती धर्माचा फारसा परिणाम झाला आहे असे वाटत नाही.खिस्ती मिशनऱ्यांना आदिवासींकडून तसा फारसा प्रतिसाद मिळत नाही.दुष्काळ, पूर व इतर आर्थिक समस्यांनी पिडलेले व हिंदूंनी दुर्लक्षित केलेले आदिवासीच ख्रिस्ती बनले आहेत. इतर आदिवासी जनता मिशनऱ्यांच्या प्रलोभनाला बळी पडत नाही.स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मिशनरी प्रवृत्तीला बराच आळा बसला आहे.आसाम, नागालँड, मिझोराम वगैरे भागात ब्रिटिश अमदानीत ख्रिस्ती धर्माचा प्रसार बऱ्याच मोठया प्रमाणात झाला.हिंदू धर्म सुधारकांपूर्वीच ख्रिश्चन मिशनरी आदिवासीपर्यंत पोहचलेले होते.धर्मान्तराबरोबरच त्यांनी आदिवासींच्या शिक्षा आणि आरोग्याकडे लक्ष दिले. हे धर्मान्तरित जरी स्वत:स इतरांपेक्षा श्रेष्ठ मानीत असले तरी इतर आदिवासी त्यांच्याकडे तुच्छतेने पहातात. दुष्काळ, पूर वगैरे बाबतीत सरकारने योग्य त्या उपाययोजना आता केल्या आहेत, तसेच शिक्षण सक्तीचे केले आहे. इतर विकास योजनाही अंमलात आणल्या आहेत. आता यापुढे मिशनऱ्यांचे काही चालणार नाही हे निर्विवाद आहे. त्यातूनही काही भागात धर्मान्तरे घडतात. त्यांचे पडसाद सर्वत्र उमटू लागले आहेत. काही आदिवासींनी ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केला असेल तर, त्यात त्यांचा दोष काय ख्रिश्चन मिशनरी व संघ परिवारातील वनवासी कल्या आश्रमवाले त्यांच्यात कोणताही फरक दिसत नाही. हे आश्रमवाले तथाकथित हिंदू सुधारक आपले मनुवादी व परंपरावादी विचार आदिवासी लोकांवर लादून त्यांना खऱ्या अर्थाने बाटवत आहेत. मिशनऱ्यांयेवढेच तेही दोषी आहेत हे कोणाला नाकारता येणार नाही.

शकरीकरण, औद्योगिकीकरण व कृषिकरण व कृषिउत्पादन बाजार ह्या आर्थिक बाबी समजल्या जातात. समाजशास्त्रज्ञ व मानववंशशास्त्रज्ञ म्हणतात त्याप्रमाणे ह्या बाबींचा संबंध संस्कृतीशी नाही. आपण् शहरी जीवनच पत्करावे असे आदिवासींना वाटत नाही. अगदी थोडे आदिवासी लोक शहरात स्थायिक झाले आहेत. मुंबईसारख्या 100 लाख वसतीच्या शहरात उणेपुरे 1 लाख आदिवासी नाहीत. त्यापैकी 30-40 हजार आदिवासी मुंबईच्या जुन्या रानावनात राहतात. बाहेरून मुंबईस येणाऱ्या आदिवासींची संख्या फारच कमी आहे. दिल्ली हे भारताच्या राजधानीचे शहर.त्याची वस्ती आता 40 लाखांच्या वर गेली आहे.पण तिथे आदिवासी औषधालाही मिळणार नाहीत. 5/6 कोटी आदिवासींपैकी 10 लाख आदिवासीसुध्दा शहरी उद्योगधंद्यांत शिरले आहेत असे दिसत नाही.शहरी जीवन हे ग्रामीण व जंगली जीवनाहून अगदी भिन्न आहे.जंगलातून बाहेर आल्यावर तेथील आदिवासींना आपले घरदार व शेती ह्याबद्दलचा आर्थिक मोबदला स्वीकारून आपले मूळ वतन सोडावे लागते. अशा परिस्थितीत काही आदिवासी बांधव आणखी आतील भागात जातात, तर काही त्या भागात जे नवे शहर वसू लागले त्यात जाऊन राहू लागतात. त्यांना धंद्याचे प्रशिक्षण नसल्यामुळे शहरात आदिवासी साधे मजूर बनतात व कसेतरी आपले पोट भरतात. त्यांचे जुने संस्कारी जीवन शहरात नष्ट होते व इतर मजूर त्यांच्याकडे पहातान ते कोणी रानटी आहेत अशीच दृष्टी ठेवतात. आपले उद्दिष्ट असे आहे की, उद्योगधंद्याचे विकेंद्रीकरण होऊन ग्रामीण भागात धंदे जावेत. त्याकरिता उत्पादनाची व दळणवळणाची साधने, पाणी, वीज वगैरे सुविधा त्यांना उपलब्ध् करून द्याव्यात. जंगल भागासंबंधी म्हणावयाचे तर कृषी वनौपजावरील उद्योगांना वाव आहे. जंगलाचे औद्योगिकीकरण झाले तर आदिवासी बांधवांना त्यांच्या गावी काम व पैसा मिळू लागल व ते शहराकडे धाव घेणर नाहीत. औद्योगिकीकरणामुहे आदिवासी जीवनावर बरेवाईट परिणाम होतात ते खरे आहे, पण असे आदिवासी थोडे आहेत. त्यांच्या जीवनात शहरी जीवनाने क्रांती होत असली तरी पाच कोटी आदिवासींच्या नेहमीच्या जीवनावर त्याचा काहीच परिणाम होत नाही.परिणामी आदिवासी जीवन बदलाचे चित्र निराशाजनक दिसते.

शहरी जीवन किंवा औद्योगिकीकरण ह्यांचा आदिवासी जीवनावर तितकासा परिणाम दिसत नसला तरी साप्ताहिक बाजार अगर बाजाराच्या जागा ह्यांचा त्यांच्या जीवनावर बराच परिणाम होत आहे. साप्ताहिक बाजार देशाच्या कोनाकोपऱ्यातून भरत असतात. त्या बाजारांना हजारोंच्या संख्येने दूरदुरून आदिवासी बांधव येत असतात. त्यांत त्यांच्या स्त्रियांचा भरणा फार मोठा असतो.त्याचप्रमाणे आदिवासींखेरीज इतर जनताही शेकडोंच्या संख्येने तेथे गोळा होते.ह्यायोगे वस्तंची देवाणघेवाण तर होतेच पण एकमेकांचा संवाद-संपर्कही वाढण्यास संधी मिळते.ह्यामुळे दोघांच्याही जीवनावर हळूहळू परिणाम होतो आणि संस्कृती-सहवास येथे वाढतो.

आपल्या समाजाचे पारंपरिकेतून आधुनिक अवस्थेत परिवर्तन होत असताना ताण व संघर्ष निर्माण होणे अपरिहार्य असते.त्या संघर्षाची कारणे शोधून काढणे व त्यांच्या अनिवार्य परिणामांची तीव्रता कमी करणे हे उचित होय. आता आपण आदिवासींच्या समाजाचा त्या दृष्टिने विचार करू.

आदिवासींमधील नव्या नेतृत्वाने जमातीत स्वतंत्र अस्मितेची, आत्मसन्मानाची जाणीव निर्माण केली आहे.भारताच्या घटनेने आदिवासींना केंद्रीय आणि राज्यातील कायदेमंडळात राखीव जागा दिल्या आहेत. काही राज्यांतील मंत्रीमंडळात आदिवासींचा समावेश केला गेला आहे.पंचायत राज्यातही त्यांन प्रतिनिधित्व मिळाले आहे.या सर्व गोष्टींमुळे त्यांच्यातील राष्ट्रिय भावना वृध्दिंगत होत आहे.संस्थागत निवडणुका लढवितानात्यांना राजकीय क्षेत्रातील प्रशिक्षण मिळत आहे.परंतु घटनेतील खास तरतुदींनी आदिवासींचे समाधान झालेले नाही.खास तरतुदींचा त्यांना पाहिजे तेवढा फायदा झालेला नाही.आदिवासींच्या अस्तित्वाचा लढा सुरू झला आहे, तो संपणार केव्हा हे सांगता येत नाही.

आदिवासी व इतर जनता यात आर्थिक क्षेत्रात उद्धवणाऱ्या संघर्षाविषयी अधिक चिंता वाटते. प्राथमिक अवस्थेतील शेतीही न करता जंगल उत्पादन व जंगली जनावरांची शिकार यावर चरितार्थ चालविणाऱ्या काही आदिवासी जमाती आजही आहेत. पण त्यांची संख्या अत्यल्प असून ती उत्तरोत्तर कमीकमी होत आहे. यानुढे अशा जमाती संस्कृतिसंर्घषात व आर्थिक तणावात नष्ट तरी होतील किंवा आजूबाजेच्या अन्य समाजात विलीन होऊन"पतित जीवन" जगतील असा भविष्यवाद संभवतो.आदिवासीचा दुसरा एक गट "बदलती शेती" (शिफ्टिंग कल्टिव्हेशन) करणारा आहे.या गटात सुमारे 10-15 लाख आदिवासी असावेत असा अंदाज आहे.भारताच्या 11 राज्यातील सुमारे 15 लाख एकर जमिनीत ते दरसाल बदलती शेती करतात. बदलत्या शेतीचे अनिष्ट परिणाम त्यांना पटवून देण्याचे सरकार व समाजसेवक प्रयत्न करत आहे.कायदा आणि नियमांनी अशी शेती दिवसेंदिवस अशक्यप्राय होत आहे.पुरवणी उत्पन्न मिळणारा आदिवासींमधील तिसरा गट सर्वात मोठा आहेत. हा गट आता राजकीयदृष्टया जागृत होत आहे.त्यातून नवे नेतृत्व उदयास येत आहे. मंत्रिमंडळातील आदिवासी प्रतिनिधी तसेच राज्यातील कायदे मंडळे, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, ग्रामपंचायती वगैरेमधीलआदिवासी प्रतिनिधी प्राधान्याने या गटातील आहेत. या वर्गाला प्रगती हवी असली तरी स्वत:ची जीवनपध्दती बदलण्यास ते तेवढे तयार नाहीत. जमीनदार, लहान व्यापारी, जंगलाचे ठेकेदार, सरकारी अधिकारी वगैरेंकडून आदिवासींची होणारी पिळवणूक थांबली पाहिजे असे ह्या वर्गास वाटते आणि त्या मुद्यांवर अनेक ठिकाणी या वर्गाने संघर्ष निर्माण केले आहेत. ही पिळवणूक नष्ट करण्यासाठी आदिवासी जनता व काही स्वयंसेवी व संघर्षवादी संघटना झगडत आहेत. त्यामुळे बिगर आदिवासी समाज सतर्क झालेला आहे.

आदिवासी प्रतिनिधींच्या प्रयत्नांमुळे कूळकायदा, कमाल जमीन-धारणा कायदा, सावकारी नियंत्रण कायदा, जमीनदारी, आर्थिक शोषण, जमिनी हस्तांतरण नष्ट करणारे कायदे करण्यात आले आहेत. आदिवासींना या कायद्यांनी बराच दिलासा मिळाला आहे. परंतु अंमलबजावणीतील अडथळे पाहता शासनाचा दृष्टिकोन बदलल्याशिवाय त्याचा फायदा आदिवासींना होईल असे वाटत नाही.50 टक्के आदिवासी भूमिहीन मजूर आहेत. 30 टक्के आदिवासी अल्पभूधारक आहेत. त्यामुळे बहुसंख्य आदिवासींना विकासाचा योग्य वाटा मिळत नाही.बहुसंख्य आदिवासींच्या असंतोषाचे मूळ येथे आहे.

असंतोषाचे आणखी एक कारण म्हणजे सध्याचे जंगलविषयक धोरण व वनजमिनींचा प्रश्न. या प्रश्नांची सोडवणूक समाधानकारकपणे होत नसल्याने आदिवासी अवतीभवतीच्या निसर्ग साधनसंपत्तीपासून वंचित होत आहे.पर्यावरण संतुलन व सामाजिक वनीकरण, वन लागवड यात आदिवासींचा सहभाग मोठया प्रमाणात वाढला तर या प्रश्नांची तीव्रता कमी होईल असे वाटते.जंगलतोड बंद केली आहे, परंतु वनवृध्दीसाठी आदिवासींचे मोठे सहकार्य असल्याशिवाय हे काम यशस्वी होणार नाही.ही संपत्ती राष्ट्रीय मालमत्ता जशी आहेत तशी ती आदिवासींची देखील संपत्ती आहे, याची आदिवासींमध्ये जाणीव निर्माण झाली पाहिजे.जंगलातील उत्पन्नाचा 50 टक्के वाटा आदिवासींना हक्काने मिळायला हवा.

आदिवासींचा एक चौथा वर्ग आहे. पोलादाचे कारखाने, विजेचे कारखाने, खाणी, मोठे औद्योगिक प्रकल्व धरणे वगैरे सुरू झाल्यामुळे ज्यांना स्थलांतर करावे लागते, तो हा वर्ग आहे, बिहार, ओरिसा, पश्चिम बंगाल व मध्यप्रदेश, महाराष्ट्र, गुजरात,

कर्नाटक, आंध्रप्रदेशातील आदिवासी या वर्गात आहेत. समाज आणि भौगोलिक परिस्थिती यावर अशा स्थलांतराचा परिणाम होतो. यातून मानसिक, सामाजिक व आर्थिक परिणाम होतात. औद्योगिकीकरणाच्या प्रश्नांचा व विस्थापित होणाऱ्या आदिवासी समाजाच्या प्रश्नांचा व्यापक संदर्भात अजून विचारझालेला नाही. आदिवासींचे "सक्तीचे स्थलांतर" हा महत्त्वाचा सामजिक, आर्थिक आणि नैतिक प्रश्न आहे.त्याचे परिणामराजकीयही दिसू लागले आहेत. परंतु आदिवासींना याची पुरेशी जाणीव झालेली नाही.

अलिकडे आदिवासी या प्रश्नांवर संघटित होऊन संघर्ष उभा करत आहेत. पण हे संघर्ष फार काळ टिकणारे नाहीत. कालांतराने ते संघर्ष नष्ट होतील. आदिवासींमधील दारिद्रय आणि बेकारीचा प्रश्न सुटल्यावर आदिवासी व इतरांतील सामाजिक संघर्ष नष्ट होतील.

आदिवासी समाज इतर समाजाशी एकरून होण्यासाठी आणखी एका गोष्टीची मोठी गरज आहे आणि ती म्हणजे शिक्षण.कोणत्याही मागासलेल्या समाजाचा विकास व्हावयाचा असेल, विशाल समाजात तो सहज एकरून, एकात्म व्हावयाचा असेल तर प्रथम त्या समाजात शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे.म्हणूनच आदिवासींच्या सुधारणेसाठी व परिवर्तनासाठी शिक्षणाचा प्रसार वाढला पाहिजे.शिक्षणामुळे त्यांची दृष्टी व्यापक आणि विशाल होईल.भोवतालच्या समाजाचे सम्यक ज्ञान त्यांना सहज प्राप्त होईल. भोवतालच्या समाजाचे सम्यक ज्ञान त्यांना सहज प्राप्त होईल व समाजघटकांमध्ये इष्ट स्पर्धा आणि महत्त्वाकांक्षा निर्माण होऊन आदिवासी समाजाला स्वसत्त्वाची जाणीव निर्माण होईल.अस्मितेचा अंकुर फुटेल. पण हे होण्यासाठी प्रथम शिक्षणाची गोडी निर्माण होणे व शिक्षणाचे महत्त्व आदिवासींना पटविणे जरूरीचे आहे.शिक्षण हे मानवी जीवनाचा "टर्निंग पॉईंट" आहे यावर त्यांचा अद्याप विश्वास बसलेला नाही.त्यांची ही शैक्षणिक कमकुवतता त्यांच्याच प्रगतीच्या आड येत आहे व विचार देवाण-घेवाण करण्याच्या बाबतीत व त्यांचे शोषण करण्यास पोषक ठरत आहे.शिक्षण ही आर्थिक विकासाची देखील गुरूकिल्ली आहे हे विसरून चालणार नाही.किंबहुना आदिवासींचा आर्थिक विकास हा खऱ्या अर्थाने शिक्षणावरच अवलंबून आहे.आज सहजगत्या मिळणारी निसर्ग साधनसामग्री भविष्यकाळात कमी होईल किंवा तिला तो पारखा होईल ही भीती आहे.म्हणून आदिवासींचा आर्थिक विकास व्हावयाचा असेल तर त्यासंबंधीची त्यांची जाणीवही विकसित होणे आवश्यक आहे.आदिवासी विभागातील सामाजिक परिस्थितीचे अपरिहार्य दडपण आर्थिकविकासाच्या कार्यक्रमांवर येते.येथील ाणसात सामाजिक जाण निर्माण व्हावयास हवी आहे आणि शिक्षण त्याकरिता अतिशय गरजेची बाब ठरते.परंतु आजचे शिक्षण हे कामाशी फारकत झालेले व फारकत करणारे आहे.ही फारकत टाळून जीवननिष्ठा जगता येतात याचा साक्षात्कार घडविणाऱ्या शिक्षणाचा शोध घेतला पाहिजे.

आदिवासी माणूस सदैव कर्जातच बुडालेला असतो.त्याच्या नशिबी दारिद्रय आणि हलाखीचे जीवनच असते.आदिवासी विभागात दारूचा प्रभाव भयावह आहे.आदिवासींच्या विकासासाठी शासन जेवढा खर्च करते तेवढया किंमतीचा काळा गूळ, महूफुले त्या भागात विकली जातात. विकासाचा फायदा असा हा शून्यवत होतो.भविष्यकाळा बद्दलचीही बेसुमार बेदरकारी आहे.या माणसांचा भविष्यकाळ हरवलेला आहे.त्यामुळे चांगले जीवन जगणे, बचत करणे वगैरे गोष्टी त्यांच्या समजुतीपलीकडच्या आहेत. त्यामुळे हाती आलेला पैसा असातसाच खर्च केला जातो.त्यातच अंधरूढींचा पगडा जबरदस्त आहे.मर्तिक व लग्न या दोन बाबींवर खर्च करायलाच हवा असे रूढीचे जणू बंधनच आहे.या सर्व परिस्थितीत नुसते आर्थिक उत्पादन वाढून कार्यभाग होण्यासारखा नाही.तेथला माणूस समजून घेऊन त्याची सामाजिक जाण वाढविणारे शिक्षण् त्याला मिळणे आवश्यक आहे.स्वाभाविकच येथील कामाच्या अनुभवाच्या पार्श्वभूमीवर शिक्षणाने काय साध्य करायला हवे याची रूपरेषा नजरेसमोर स्पष्ट होऊ लागते.तेथील शिक्षणाची किमान उद्दिष्टे खालीलप्रमाणे असली पाहिजेत.

1. औदासिन्य कमी करून आदिवासी माणसाला कार्यप्रवृत्त करणे.
2. जीवनाबद्दलची आकांक्षा, अभिलाषा निर्माण करणे.
3. श्रम करून येथील माणूस स्वत:च्या पायावर उभा राहू शकतो असा आत्मविश्वास निर्माण करणे.

4. उपयोगात न आणलेली अशी जी पडून राहिलेली साधनसंपत्ती व श्रमशक्ती तेथे आहे, तिचा उपयोग करून भांडवलनिर्मिती करणे.
5. शिक्षण संपल्यावर शिक्षित माणूस त्याच्या कौशल्य व तंत्रज्ञाननिहाय याच विभागात राहील एवढा बदल त्यांच्यात निर्माण करणे.

औदासिन्य नष्ट करणे, कार्यप्रवृत्ती वाढविणे या दोन गोष्टी एकमेकांना पूरक अशाच आहेत. तेथे एक जबदरदस्त् औदासियाचा थ समाजजीवनावर साकळलेला आहे. वर्षानुवर्षाच्या पिळवणुकीतून व शोषणातून तेथील माणसावर इतका काही औदासिल्याचा प्रभाव आहे की, त्यामून आहेर येऊन कोणी काही करू शकेल हा विश्वासच जणू नष्ट झाला आहे.शेती हाच येथील प्रमुख धंदा किंवा उपजीविकेचे साधन.पण तीसुध्दा कशीतरी रखडत रखडत होत असते, कारण साधनंचा सदैव तुटवडा. त्यामुळे वर्षातून एकदा धानाचे किंवा बाजरीचे पी घेतले की जमीन रिकामीच असते, दुसरे पीक घेण्याचा आदिवासी फज्ञरसा प्रयत्न करीत नाहीत. त्याला लोकांचा प्रतिसाद मिळत नाही. उत्तम गव्हाचे पीक, उत्तम ज्वारी किंवा बाजरीचे पीक घेऊन त्यांच्याच शेतात प्रात्यक्षिक करून दाखविण्याची, प्रयोगशाळा सुरू करण्याची खरोखर नितांत गरज आहे.पण माणूस हलत नाही.

आदिवासींची शेती सुधारण्याच्या कार्यक्रमात काही अडचणी आहेत आणि त्या दूर करणे बरेच कठीण आहे.त्या अडचणी मानवनिर्मित किंवा मानवाशी संबंधित आहेत. या विभागात शेतकऱ्याला भातशेती व कडधान्य करण्यापलीकडे फज्ञासे ज्ञान नाही, सवय नाही.हे शेती करतात तर मग ज्वारी, गहू यांची शेती ते करतील ही आपण गृहित धरलेली गोष्ट तितकीशी खरी नाही.येथे जी काही एक अधुरी, अपूर्ण अशी संस्कृती निर्माण झालेली आहे, त्यात भात तांदळाला अत्यंत जिव्हाळयाचे पवित्र स्थान आहे. कोणीही कोठे बसलेले असले तर सहजपणे केरकचऱ्यातून भाताचे दाणे निवडून काढतील. वेचणी करायला लागले तर भाताचे रोप उपटणार नाहीत. “कणसरी” म्हणजे भाताची लोंबी हातात घेऊन शपथ घेतली तर त्या शपथेला मोठा अर्थ प्राप्त होतो. भाताचा दाणा, भाताचे रोपटे यांना जीवनात, संस्कृतीत एक आगळेच स्थान प्राप्त झालेले आहे.माणसे पावसाळयात भाताच्या लागवडीच्या वेळीच मनापासून काम करीत असताना दिसतात. खायला धान्य कर्जाऊ आणलेले असते.त्यावेळी घरात धान्य आहे तेव्हा काम कशाला करावयाचे असे कोणी म्हणावयाचे ठरविले तर अशक्य नाही.पण आळशातला आळशी माणूससुध्दा भात लागवडीत गुंतलेला असतो.याचा अर्थ घरात खायला आहे म्हणून येथील सर्वसाधारण माणूस काम करीत नाही असे आपण जे मानतो त्याला भातशेती हा अपवाद आहे.खरे म्हणजे भात पिकल्यावर त्याला भात 2-3 महिनेच पुरेल हे माहीत असते.त्याने जर रब्बी लागवडीमध्ये ऑक्टोंबर-नोव्हेंबर महिन्यात उत्साहाने भाग घेतला तर त्याला काम मिळून त्याची उपासमार कमी होऊ शकेल. पण तो रब्बी लागवडीबाबत उदासीन असतो.या उलट पावसाळयात जेमतेम एक महिना पुरेल एवढेच धान्य त्याने कर्जाऊ आणलेले असते आणि तो भातशेतीची कामे उत्साहाने करतो.तेव्हा घरात खायला नाही म्हणजेच तो काम करतो एवढेच स्पष्टीकरण भातशेतीच्या संदर्भात अपुरे पडते.ही एक प्रकारची संस्कृतीच निर्माण झालेली आहे.की, “भातशेती हे दैवत आहे.” भाताचे काम करावयाचेच.म्हणूनच पाऊस पडला की, मोकाट गुरे बंदिस्त होतात.शेतात भात आहे तोवर गावाचा एक अलिखित असा कायदा असतो की, कोणीही गुरे सोडायचीनाहीत. यातही भातशेतीला संरक्षण दिलेले आहे. भात पिकाभोवती आणखीही बरेच जीवनातील प्रसंग गुंतलेले आहेत. अक्षता वापरणे, खळयाच्या देवाची पूजा करणे, लग्नाचे चौक भरणे, गाव दिवाळीला घरोघरचे तांदूळ जमविणे, भगताने तांदूळ चाळणे वगैरे गोष्टीनिगडित आहेत.

तेव्हा गव्हाची लागवड ऑक्टोंबर-नोव्हेंबरला सुरू करण्यात ही मानसिक अडचण आहे. त्यावेळी भात कापणी पूर्ण होऊन उडवी रचलेली असतात, भारे बांधलेले असतात. झोडणी न करता गहू लागवडीच्या कार्यक्रमाला जोरात लागायला हवे, पण त्यावेळी माणसे हे काम करण्याच्या मन:स्थितीत नसतात. तुम्ही बोलावलेत तरी कामाला येणार नाहीत. तेव्हा दुसरे पीक काढण्याची गरज, विहिरीची गरज, नदीचे पाणी वापरावयाचे ही गरज वगैरे गोष्टी लहानपणापासूनच येथील शिक्षणक्रमात घालाव्या लागतील. हे लहान मुलांना नव्याने शिकवावे लागेल. नवेअभ्यासक्रमत्यासाठी तयार करावे लागतील.

लहानपणापासूनच शिक्षणातून मुलांच्या मनावर संस्कार घडवून जीवनाबद्दलचे औदासिच दूर करण्याचामुद्दाम प्रयत्न करण्याची जरूरी आहे.तसेचकार्यप्रवृत्त करणारा अभ्यासक्रम आखावा लागणार आहे.त्यांन समजणारी भाषा बोलायला हवी.गवतातला ‘‘ग’’ त्यांना समजू शकेल. पण कमळातला ‘‘क’’ समजणे कठीण आहे.कमळ कधी पाहाण्याची वेळ येत नाही.त्यांना कणसरीमधील ‘‘क’’ समजू शकतो आणि एकूण भाषाच कणसरी, भाताच्या लोंबीभोवती गुंफलेली हवी.शेतीशिक्षणाचे वर्ग शेतावरच भरवावे लागतील. शिक्षणाचा असा एक वेगळाच प्रयोग करावा लागेल.

येथील दारिद्रयकमी करावयाचे तर आपल्याला सहज, सोप्या सरळ वाटणाऱ्या गोष्टी करण्याबद्दल त्यांच्यात औदासिन्य आहे, नदीचे पाणी दुथडी भरून वाहात असते तरी त्याचा उपयोग करून उत्पदनवाढ करण्याची प्रेरणाच लुप्त झालेली आहे, हे बदलावे लागेल. आपल्याला हे औदासिन्य पाहून कमालीचा उद्वेग येतो, नैराश्य येते.

हे व असेच प्रश्न या विभागाच्या आर्थिक विकासाशी निगडीत आहेत. बाहेरून कोणीतरी येऊन यक्षिणीची कांडी फिरवून चमत्कार करून हा विकास घडवू शकणार नाही. तो तेथील माणसांनी स्वत:च्या हिमतीवर, आत्मविश्वासावर उभे राहून घडवून आणावयाचा आहे.आणि आज येथील माणूस तर कणा मोडलयासारखा वाटतो आहे.तर मग हे घडावे कसे.

त्याकरिता या कार्यक्रमाची सुरूवात शिक्षणापासून करावी लागेल आणि येथील आर्थिक विकासाच्या कार्यक्रमाशी आश्रमशाळांचा संबंध व समन्वय सुरू करण्याचा विचार करावा लागेल. आदिवासी विभागात 700-800 आश्रमशाळा आहेत. परंतु समाजजीवनावर आर्थिक परिणाम घडविण्याच्या दृष्टिने आणि आर्थिक व सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन बनण्याच्या दृष्टिने त्या फारशा प्रभावी झालेल्या नाहीत. या गोष्टींची दखल घेऊन येथील आश्रमशाळेचा अभ्यासक्रम व उपक्रमशीलता बनललेली असावी ही आजही गरज आहे. वानगीदाखल एक दोन गोष्टींचा उल्लेख करता येईल.आदिवासी भागात रोपे करण्यासाठी जागा भाजून घेण्याचा रिवाज आहे. त्याला राब म्हणतात. ही राबाची जागा तयार करण्याकरिता वर्षभर माणसे शेण गोळा करीत असतात. गुरे मोकाट सोडलेली असतात. त्यांचे जे शेण शेतात किंवा माळरानावर पडलेले असेल, ते टोपली, दोन टोपली, दिवसभरात एक बाई गोळा करते. तिच्या मजुरीचा हिशोब करण्याचा प्रश्न नसतो.ते जाळण्यासाठी किंवा स्वतंत्र तऱ्हेने जाळण्यासाठी झाडांचापाला (डहाळे) तोडण्यात येतो.त्यामुळे जगलातील झाडांचे फारच नुकसान होते.हिवाळ्यात पानझड होते. मोठाली टोपली डोक्यावर घेऊन सुकलेली पाने राबावर जाळण्यासाठी सकाळ-संध्याकाळ नेण्याचा उद्योग असंख्य माणसे करीत असतात. त्याऐवजी या पाल्यापाचोळयाचे कंपोस्ट खत करून ते वापरले तर जमिनीचा पोत सुधारण्याच्या दृष्टीने कितीतरी पटीने फलदायी होऊ शकेल. हे सर्व प्रात्यक्षिक शिक्षणाद्वारे मुलांपर्यंत व नंतर त्यांच्या शेतीपर्यंत पोहोचविले पाहिजे.

दुसरे उदाहरण आहे उनाड, मोकळया, सुटक्या गुरांचे, भाताची कामे सुरू झाली की गुरे बांधली जातात. बाकीचे दिवस ती मोकाट सुटलेली असतात. सर्वांची गुरे सर्वांच्या शेतात जमिनी उजाड करीत असतात. त्यामुळे कुंपणाचा खर्च अतोनात वाढतो.सर्वांना दरवर्षी कुंपण करावेच लागते.कितीतरी वेळ मजुरी त्यात वाया जात असते.शिवाय दुसरे पीक या गुरांच्या उपद्रवामुळे घेताच येत नाही.हे सर्व बंद करावयाचे तर लहानपणापासूनशिक्षणातून हे संस्कार घडवायला हवेत.

येथे शेतकऱ्यांजवळ खायला असे फारसे नसते, म्हणून त्याला दसऱ्याअगोदर पिकेल असे भात हवे असते. त्याला हळवे भात असे म्हणतात. कुडअी, महाडी, हारी, साठी, पाढरी साळ, तांबकुडी या भाताच्या जाती 60 ते 90 दिवसात पिकतात. त्यांचे उत्पन्ा फारच कमी म्हणजे जेमतेम एकरी 200 ते 400 किलो येते.स्वाभाविकच ते पिकवलेले भात फारच कमी दिवस टिकते.परंतु आता कमी दिवसात पिकणाऱ्या भाताच्या जातीवर संशोधन झालेले आहे.पावसाळयात या जातीची पिके घेणे शक्य होणार आहे.त्यामुळे एका एकरातून वर्षभर खायला पुरेल एवढे उत्पादन सहज वाढविता येण्यायोगे आहे.हे शिक्षणातून मुलांना समजायला हवे.आधीच संवेदनक्षमता जीर्ण झालेल्या येथील शेतकऱ्यांवर नुसत्या प्रात्यक्षिकांचाफारसा परिणाम होत नाही असा अनुभव आहे.तो परिणाम शाळेच्या शिक्षणातून घडवून जीवनाचा एक भाग बनवायला हवा आहे.

आदिवासी जीवनाचा वेध घेताना मनुष्यस्वभावाचे दर्शन घडते.त्यातून आर्थिक व सामाजिक विकास हे परस्परावलंबी कसे आहेत हे प्रकर्षाने जाणवते.दोन्हीही विकास एकाच वेळी एकमेकांचा तोल सांभाळून करण्याची गरज जाणवते.त्याकरिता

शिक्षण जीवनाभिमुख करण्याची गरज आहे. सुदैवाने या घडीला शिक्षणातील तोकडेपणा व दृष्टीख अभाव यांची जाणीव फार मोठया प्रमाणात शिक्षणतज्ज्ञांना या प्रश्नांशी संबंधित व्यक्तींना जाणवू लागली आहे. अशावेळी परिस्थिती नुरूप शिक्षण हे शाळेच्या चार भिंतींच्या खोलीत कोंडून न ठेवता त्याला बाहेर मोकळे करून जीवनाचा विविध पैलूंचा स्पर्श करण्याची आज मोठी गरज आहे.

आदिवासी जीवनाचे सध्याचे चित्र सर्वांच्या मनात नैराश्य निर्माण करते.सारे समाज सुधारत आहेत, विकसित होत आहेत, प्रगती करत आहेत आणि त्यांच्यामध्ये सर्व क्षेत्रात परिवर्तन होत आहे.मग आदिवासी समाजाचे असे का समाज अप्रगत असला तरी तो बदलत असतो हा निसर्गाचा आणि नियतीचा नियम आहे.जगातीलसर्व समाजांचे ऐतिहासिक गठन असेच झालेले आहे. आदिवासी समाज त्याला अपवाद कसा असणार

स्वातंत्र्याननंतरच्या 50 वर्षाच्या कालावधीत महाराष्ट्रातील जनतेशी आदिवासींचा बराच संपर्क आलेला आहे.विचारांची देवाण घेवाणही त्यामुळे होऊ लागली आहे. आदिवासी व गिर आदिवासी यांच्यामध्ये जिथे तीव्र सामाजिक मतभेद होते ते आज निवळलेले आहेत. आजपर्यंत सेवाकार्यासाठी निर्माण झालेल्या संस्थांनी केलेली कामे, नि:स्वार्थी आणि सेवाभवी कार्यकर्त्यांनी केलेले कार्य व शासनाने दिलेला सहकार्याचा हात यामुळे आदिवासी समाजात सामाजिक परिवर्तनाचे नवे दालन खुले झाले आहे.वेगवेगळया लोकांशी संबंध येऊ लागल्यामुळे आदिवासींची बुध्दी व्यापक होऊ लागली आहे. अन्याय, जुलूम, जबरदस्तीयापासून स्वत:ला दूर ठेवण्याऐवजी अन्यायाचा प्रतिकार करण्याची जिद्द त्यांच्यात निर्माण होऊ लागली आहे. शेठसावकारांना, अधिकाऱ्यांना बिचकणाऱ्या आदिवासींचा बुजरेपणा, भेकडपणा गेल्या 50 वर्षांत पुष्कळच कमी झालेला आहे.हे चित्र निश्चित आशादायक आहे.

महाराष्ट्रातील आदिवासींत होत असलेले हे परिवर्तन वा सामाजिक बदल सर्व जमातीत सर्व ठिकाणी एकसारखा नाही. महादेव कोळी, कोकणा, राजगोंड आणि भिल्ल या जमातींत असे बदल झपाटयाने होत असल्याचे दिसते, तर माडिया, गोंड, कोरकू, कोलम, ठाकर, कातकरी आणि वारली या जमाती कमी-अधिकप्रमाणात आपले पारंपरिक जीवनच जगत आहेत. आदिवासींच्या सामाजिक बदलाचे सविस्तर समालोचन करणे इथे शक्य नाही. परिवर्तनाच्या मुळाशी असलेली एक गोष्ट मात्र निर्विवाद मान्य केली पाहिजे.ती म्हणजे ज्या जमाती शेतीवर स्थिर आहेत, ज्यांच्यात बाह्य समाजाशी संघर्ष करण्याचे धारिष्टय व मानसिक कुवत निर्माण झाली आहे व जिथे सामाजिक आणि शैक्षणिक जागृती आणि प्रेरणा निर्माण केली गेली आहे त्या जमातींत सामाजिक आणि आर्थिक बदल जलद गतीने होऊ लागले आहेत. त्यांच्यात विकासाची प्रवृत्ती व लालसा वाढत आहे. शिक्षणाची गोडीही वाढत आहे.त्यांची अस्मिता वाढत आहे.स्वसत्त्वाची जाणीव त्यांना होऊ लागली आहे.

आदिवासी विकासासाठी झालेला मुख्यत्वे वैयक्तिक साधनसुविधकवर झाल्यामुळे समाजाच्या आर्थिक व शैक्षणिक क्षेत्रात विकासाची गती मंद आहे. पालेमोड योजना, खावटी योजना, कर्जवाटप योजना, सावकारी नियंत्रणकायदा, आदिवासी जमिनीचा हस्तांतरबंदी कायदा, आदिवासींच्या आर्थिक विकासाचा कायदा, एकाधिकार धान्य खरेदी, न्यक्लिअस बजेट, प्रशिक्षण योजना असे अनेक उपाय योजूनही आदिवासींना आर्थिक स्थिरता अद्याप प्राप्त होऊ शकलेली नाही.पूर्वीसारखी उघड चालणारी सावकारी, आता वेगवेगळया मार्गांनी आडपडदा ठेवून चालविली जाते.शोषणाचे सूत्र मात्र आहे तेच आहे व एकूण परिणामही तोच आहे.जागृत झालेला आदिवासी मात्र पूर्वीची सावकारी वहिवाट मोडत चालला आहे. शेतातील सर्व पपीक दुकानदार सावकाराकडे पोहोचवावयाचे व वर्षभर लागेल ते धान्य, कपडालत्ता, किराणा माल त्यांच्याकडून आणावयाचा, हिशोब दुकानदारानेच ठेवायचा अशी 30/40 वर्षापूर्वी जी स्थिती होती, ते स्वरूप बदलून धान्याचे माप देणे, सध्याचा बाजारभाव काय आहे याची चौकशी करणे, पैशाचा हिशेब लगेच घेणे हे प्रकार वाढू लागले आहेत. यापूर्वीच्या पध्दतीत आपले नुकसान होत होते, शोषण होत होते, याची त्यंना जाणीव झाली आहे. हंगामात धान्य स्वस्त भावाने घ्यायचे व पावसाळयात दीडदुपटीने द्यायचे, कायम कूळ पकडून ठेवण्यासाठी प्रसंगी किंवा नेहमीच रोख पैसा द्यावयाचा, शहामत अशी की, त्यांच्याकडून व्याज घ्यावयाचे नाही, पण आपल्या मालावर भरपूर नफा कमवायचा, अशी ही परंपरागत चालत आलेली व अजगरासारखी विळख्यावर विळखे

घालणारी जी पकड होती ती ढिली होत चालली आहे.आदिवासींच्या आर्थिक, सामाजिक परिवर्तनासाठी व विकासासाठी कार्यान्वित केलेल्या योजनांचा, कायद्यांचा व नियमांचाही त्यासाठी मोठया प्रमाणात उपयोग होत आहे. सर्वसाधारण शिक्षणाचा प्रसार व प्रचार, राजकीय जागृती, काटकसर, शेतीसुधारणा व बदलती शेती सोडून कायम पध्दतीची शेती करण्याची प्रवृत्ती, उपक्रमशीलता, हिशेबी वृत्ती, भविष्यकाळाचा विचार व वाढत्या गरजांची निर्मिती त्यामुळे आदिवासीत वाढत चालली आहे.

आदिवासींच्या सामाजिक जीवनासंबंधी म्हणावयाचे तर त्यांच्या एकंदर राहणीमानात फरक पडू लागला आहे.त्यंच्या पारंपरिक जीवनात आता खूप बदल झाल्याचे आढळून येते. पुढील गोष्टी त्याला मुख्यत: कारणीभूत ठरलेल्या आहेत. कर्ज निवारणविषयक व जमीनसुधारणा विषयक कायदे, आदिवासींच्या विकासासाठी आखलेल्या खस योजना, जंगल कामगार सहकारी संस्था, सर्वोदय योजना, आदिवासी विकास गट, पालेमोड योजना, क्षेत्र विकास योजना, एकाधिकार धान्य खरेदी, आर्थिक व शैक्षणिक नियोजन, कुटुंबनियोजन, सार्वजनिक आरोग्य सुधारणा, पाणीपुरवठा, सहकारी शेती पुरवठा, पंचायती राज्य, शैक्षणिक साधने आणि सुविधा, प्रवास व दळणवळणाच्या साधनात झालेली वाढ, नव्याने सुरू करण्यात आलेले उद्योग-व्यवसाय, भोवतालच्या प्रदेशाचे झपाटयाने होत चाललेले नागरीकरण, राजकीय पक्ष व सामाजिक कार्यकर्ते इत्यांदींचा नित्य व वाढता संचार यामुळे आदिवासींचे पारंपरिक जीवन बदलत चालले आहे.

हे बदल मुख्यत: अन्न व वेशभूषेविषयी, त्यांच्या सवयी, रूढी नीतीमूल्ये, प्रतिष्ठामूल्ये, अंतर्गत भांडणतंटे मिटविण्याची व दोषी व्यक्तींना शिक्षा करण्याची पध्दती, स्त्री-पुरूष विवाहसंबंधख् आरोग्यविषयक सवयी, नागरी समाज व बाह्य जग याविषयी त्यांच्या कल्पना इत्यादींच्या बाबतीत निश्चितपणे घडलेले आहेत.

समाजशास्त्रीयदृष्टया पुढील बदल आदिवासी समाजजीवनाच्य दृष्टिने अधिक महत्त्वाचे मानले जातात.

आदिवासी समाजातील सामाजिक नियंत्रण ठेवणारी पारंपारिक पध्दती आता बहुतांशी निकामी बनली आहे.प्रत्येक जमातील पूर्वी त्यांची स्वतंत्रजमात पंचायत होती. या पंचायतीचा आपापसात होणारे वाद मिटविण्यासाठी, गुन्हेगार व्यक्तींना शिक्षा करण्यासाठी व व्यापक अर्थाने समाजाचे नियंत्रण करण्यासाठी उपयोग केला जाई. त्यांच्यात शिक्षेचे व गुन्ह्याचे स्वरूपही साधारण असेच आहे.सामाजिक नियंत्रणाची नवी संकल्पना ही पारंपरिक पध्दतीच्या विरोधी ठरली आहे. सध्याच्या निवडणुकांच्या पध्दतीत गाव, तालुका, जिल्हा पातळीवर विशेष महत्त्व प्रापत झाल्याने नेता निवडण्याची पारंपरिक पध्दती मागे पडली आहे, तसेच सामाजिक कृती करण्याचा घटक म्हणजे“हाटी”, “पाडा”, “वाडी” किंवा गाव हे प्रभावी साधन राहिलेले नाही. पाडा, खेडे व जमात याद्वारे होणाऱ्या सामाजिक जीवनाचा प्रभाव कमी झाल्याने साहजिकच पारंपरिक सामाजिक जीवनात विस्कळीतपणा आला आहे व व्यक्तिला अधिक स्वातंत्र लाभले आहे.नव्या समाजरचनेची जडणघडण त्यातून तयार होत आहे. प्रतिष्ठामूल्येही बऱ्याच प्रमाणात बदलत आहेत. जमीनजुमला, जनावरे, दैवीशक्तीवरील नियंत्रण या गोष्टींमुळे आदिवासी जमातीमध्ये व्यक्तीला प्रतिष्ठा प्रापत होई. या मूल्यांचे महत्त्व हळूहळू कमी होत चालले आहे व त्यांची जागा शिक्षण, समाजसेवा, राजकीय नेतृत्व आणि कर्तृत्व इत्यादीी नवी मूल्ये घेत आहेत. पैसा मिळविण्याच्या प्रक्रियेस अधिक महत्त्वप्राप्त झाले आहे.कौटुंबिक उत्पादनात भर घालणे व घरात हातभार लावणे या गोष्टींवर कुटुंबातील व्यक्तींची उपयुक्तता मोजली जाऊ लागली आहे.स्त्रिया व मुले यांनीही त्यासाठी कामे करावीत अशी अपेक्षा करण्यात येऊ लागली आहे.या दोन प्रक्रियेत हातभार न लावणाऱ्या वडीलधाऱ्या आणि म्हाताऱ्या मंडळींबद्दलची पारंपरिक भावना कमी झाली आहे.पाडयावरील लोकांत एकमेकाला मदत करावयाची सामुदायिक भावना होती ती हळूहळू कमी होऊन कामाचामोबदला घेण्याची प्रथा रूढ होऊ लागली आहे.कामचा मोदला पूर्वी धान्यरूपाने घेतला जाई, पण अलीकडे रोख रकमेत मोबदलास्वीकारणे लोक पसंत करू लागले आहेत. श्रमाला आणि कष्टाला मूल्य आलेले आहे.

नीतिमूल्ये बदलत चालली आहेत. प्रामाणिकपणा लोप पावत आहे.ऐहिक सुखाची अभिलाषा वाढत आहे.त्यामुळे अधिक पैसा मिळविण्याची व नव्यानव्या गोष्टी खरेदी करण्याची, नवे नवे आनंद लुटण्याची ओढ लोकांमध्ये वाढत आहे.पण त्या संदर्भात बदलाचा वेग कमी आहे.पारंपारिक धार्मिक मूल्ये व भगत-भुतावळीसारख्या संस्था यांचे महत्त्व कमी झाले आहे.स्त्री-

पुरूष संबंधविषयक पारंपरिक नीतिमूल्यांना धक्का बसला आहे. तरूण मुलांमुलींमधील विवाहपूर्व शारीरिक संबंध पूर्वी काही बाबतीत सहन केले जात, ते आता सहन केले जात नाहीत. बहुपत्नीत्वाची चाल, कोरडयावर आणणे, झगडा पध्दत, पाट पध्दत, मागलावी पध्दत, लमजाना पध्दत, काम पध्दत अशा अनेक प्रथांविरूध्द लोकमत तयार होत आहे.या प्रथा आता लोप पावू लागल्या आहेत.

आदिवासी समाज व नागरी समाज यांच्या संबंधातदेखील पुष्कळ बदल घडत चालले आहेत. आदिवासींचे पारंपरिक सामाजिक स्थान खूपच दुय्यम व कनिष्ठ पातळीचे होते.पूर्वी शेजारचे समाज आदिवासींच्या हातचे अन्न स्वीकारत नसत.अस्पृश्यांना जसे दूरवर बसविले जाई तसेच आदिवासींनाही काही समाज दूरत्वाने वागवीत. आता यामध्ये खूपच बदल घडून आदिवासी समाज जमातीबाह्य समाजाच्या जवळ आला आहे.आदिवासींमधील निरनिराळया जमातीदेखील पूर्वी एकमेकांना वरिष्ठ आणि कनिष्ठ समजत असत.रोटी-रोटी व्यवहार त्यांच्यात प्रचलित नव्हता.आज रोटी व्यवहार सर्वत्र घडतो आहे.बेटी व्यवहाराचे बाबतीत हिंदुधर्मातील जातीय बंधने आजही आड येत आहेत. पूर्वी रोटी व्यवहार फक्त काही जमातींमध्येच होत असे.उदा.महादेव कोळी, ठाकर, वारली यांच्यात रोटी व्यवहार होत नसे.हल्ली तो होऊ लागला आहे. नागरी सताजाशी संबंध ठेवताना आदिवासी पूर्वीइतके मित्रे, मवाळ व अगतिक राहिलेले नाहीत. वाहेरच्या समाजाशी दळणवळणाच्या साधनांमुळे संबंध वाढून त्यांच्या एकंदर जीवनावर परिणाम झाला आहे.उदा. महादेव कोळी, कोकणा, ठाकर या जमीतींनी मोठया प्रमाणावर हिंदूच्या चालीरीती उचलल्या आहेत. त्यामुळे परंपरागत गाणी, कथा, नृत्य यांच्यावर हिंदु संस्कृतीचा परिणाम झालेला दिसतो.परंपरागत वाद्यांच्या तालावर आज जी गीते आदिवासी गातात त्यांचा आशय आधुनिक भासतो. प्राचीन परंपरागत गाणी, कथा, लोककथा लोप पावू लागल्या आहेत. शिकलेली मुले-मुली त्यांच्या जुन्या पध्दतीप्रमाण नाच-गाण्यास लाजतात. प्रचलित पिढीला पूर्वीच्यापरंपरागत जीवनातील जुने काही शिकण्यास मिळत नसल्यामुळे ती आजूबाजूच्या समाजाचे अंधानुकरणही करू लागली आहे.लग्नकार्यात "धवलेरी" हिचे महत्त्व कमी झाले आहे.लग्नाचे मुहूर्त ब्राम्हणाकडून ठरवून ब्राह्मणाकडून लग्न लावण्याची प्रथा रूढ होऊ लागली आहे.सोय असेल तर स्त्रिया बाळंतपणासाठी दवाखान्यात दाखल होऊ लागल्या आहेत. थोडक्यात आदिवासींच्या सामाजिक जीवनाचे पारंपरिक चित्र निश्चितपणे बदलले आहे.भोवतालच्या नागरी जीवनाशी आदिवासी अद्याप संपूर्णपणे एकजीव झाले नसले तरी आज त्यांच्यात पूर्वी होते तेवढे"सामाजिक अंतर" राहिलेले नाही. हिंदू समाजातील"वागणूक पध्दतींचे" अनुकरण करण्याकडे आदिवासीत वाढती प्रवृत्ती दिसत असली तरी त्यांच्या पारंपरिक जीवनातील साधेपणा, स्वभावातील भोळेपणा, प्रामाणिकपणा, पापभीरूवृत्ती, अबोलपणा हे गुण अजूनही प्रकर्षाने जाणवतात. निसर्गावरील त्यांची श्रध्दा अद्यापही कमी झालेली नाही. आदिवासी समाजाचे बदलते स्वरूप हे असे आहे.एकविसाव्या शतकात प्रवेश केल्यावर हे बदल अधिक वेगाने होतील यांत शंका नाही.

## संदर्भ :-

1. आदिवासी प्रश्न आणि परिवर्तन, डॉ. गोविंद गारे, अमृत प्रकाशन, औरगांबाद, 1993
2. आदिवासींच्या समस्या : विचार, डॉ. गोविंद गारे, आणि विश्लेषण आदिम साहित्य पुणे, 1976
3. आदिवासी संशोधन पत्रिका. आदिवासी संशोधन व प्रशिक्षण (1979 ते 1989) संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
4. गिरीजनांचा प्रश्न, डॉ. ल. ना. चाफेकर, पुणे विद्यपीठ, पुणे
5. दि शेडयूल्ड ट्राईब्ज. डॉ. जी. एस. धुर्ये, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई
6. दि प्रॉब्लेम्स ऑफ ट्रायबल डेव्हलपमेंट, डॉ. एम. जी. कुलकर्णी, परिमल प्रकाशन, औरंगाबाद
7. दि रिव्ह्यू ऑफ रिसर्च स्टडीज ऑन ट्राईब्ज, डॉ. गोविंद गारे, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे
8. आदिवासींचे शिक्षण, डॉ. गोविंद गारे, साकेत प्रकाशन, औरगाबाद, 1997